# प्रेस नोट ता. ०७/१०/२०२०

## वाकड: ०३ वर्षीय बालकाचे अपहरण प्रकरण

### गुन्हे शाखा युनिट-४, पिंपरी चिंचवड कडुन अवघ्या १२ तासात गुन्हयाचा छडा,

### बापच निघाला अपहरण कर्ता

सदर प्रकरणाची सविस्तर हकिगत अशी की, यातील फिर्यादी नामे शोभा रामदास डोळस, वय- ४० वर्षे, रा- जीवन नगर, ताथवडे, पुणे यांनी वाकड पोलीस ठाणे येथे तक्रार दिली की, त्यांचा नातु नामे विरेंद्र महावीर साळवी, वय-०३ वर्षे हा दि. ०६/१०/२०२० रोजी १७:३० वा. सुमारास त्यांचे राहते घरासमोर खेळत असताना दुचाकी वरुन आलेल्या एका अनोळखी इसमाने त्यास जबरदस्तीने पळवुन नेले आहे अशी तक्रार दिल्याने वाकड पोलीस ठाणे, गु.र.नंबर-७०७/२०२० भा.दं.वि. कलम ३६३ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर बालकाचे अपहरणाचा प्रकार हा गंभीर स्वरुपाचा असल्याने **मा. पोलीस उप-आयुक्त,(गुन्हे) सुधिर हिरेमठ सो,** यांनी गुन्हे शाखेस तातडीने तपास करण्या बाबत आदेश दिले होते. त्या अनुशंगाने **वरिष्ठ पोलीस निरीक्षक मोहन शिंदे, गुन्हे शाखा युनिट- ४,** यांनी सदर प्रकरणाचा समांतर तपास सुरु करुन **सहायक पोलीस निरीक्षक अंबरिष देशमुख, पोहवा प्रविण दळे, पोना तुषार शेटे, पोना मोहम्मद गौस नदाफ, पोना लक्ष्मण आढारी, पोशि प्रशांत सैद** यांचे पथक तयार केले. सदर पथकाने तात्काळ गुन्हयाचे सखोल तांत्रिक विश्लेषण केले असता सदर बालकाचे अपहरण हे मितेश भगत नावाच्या इसमाने केले असण्याची शक्यता असल्याचे आढळुन आले. तेव्हा बातमीदारांना सतर्क करुन तांत्रिक तपास केला असता सदर इसम हा केईम हॉस्पिटल, रास्ता पेठ, पुणे येथे लपुन बसला असल्याची माहिती मिळाल्याने सदर पथकाने त्यास सापळा रचुन शिताफीने ताब्यात घेवुन त्याचे कडे चौकशी केली असता त्याने त्याचे नाव **मितेश उर्फ मितवा मारुती भगत, वय-२५ वर्षे, धंदा- ड्रायव्हर, रा- मु.पो.मळोली, ता-माळशिरस, जि-सोलापुर** असे असल्याचे सांगुन त्याचा गावाकडील मित्र व सदर बालकाचा वडील नामे **महावीर किंचिंक साळवे, रा- मु.पो.मळोली, ता-माळशिरस, जि-सोलापुर** याचे सांगणे वरुन त्याचे सह सदर बालकाचे अपहरण केले असल्याचे व सद्या सदर बालक हा त्याचे सह असल्याचे सांगितले. तेव्हा नमुद महावीर साळवे याचे बाबत सखोल तपास करता तो उरुळीकांचन येथे बस डेपोचे मागील परिसरात एका नातेवाईकाकडे लपुन बसला असल्याची माहिती मिळाली. तेव्हा सदर पथकाने तसेच रात्रीतुन सदर ठिकाणी जावुन संपुर्ण परिसराची छाणनी केली असता तो एका नातेवाईकाच्या घराच्या टेरसवर अपहृत बालकासह झोपलेल्या अवस्थेत मिळुन आला. त्यास दि. ०७/ १०/२०२० रोजी पहाटे ०४:०० वा. ताब्यात घेण्यात आले.

**सदर आरोपी नामे महावीर किंचिंक साळवे, रा- मु.पो.मळोली, ता-माळशिरस, जि-सोलापुर याचे कडे चौकशी करता त्याची पत्नी त्याचेसह नांदत नसल्याचे कारणावरुन त्याने वरील मित्राचे मदतीने बालक नामे विरेंद्र याचे अपहरण केले असल्याचे सांगितले आहे.**

सदर दोन्ही आरोपींना पुढील तपास कामी वाकड पोलीस ठाणे यांचे ताब्यात दिले असुन अपहृत बालकास त्याचे आईचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास वाकड पोलीस ठाणे करत आहे.

सदरची कारवाई पिंपरी चिंचवडचे पोलीस आयुक्त मा. श्री. कृष्ण प्रकाश सो, पोलीस उप आयुक्त गुन्हे मा. श्री सुधीर हिरेमठ सो, सहा. पोलीस आयुक्त मा. श्री. राजाराम पाटील गुन्हे यांचे मार्गदर्शनाखालील गुन्हे शाखा, युनिट-४ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक मोहन शिंदे, सहायक पोलीस निरीक्षक अंबरिष देशमुख, पोहवा/ प्रविण दळे, नारायण जाधव, संजय गवारे, धर्मराज आवटे, दादाभाऊ पवार, अदिनाथ मिसाळ पोना/ संतोष असवले, तुषार शेटे, लक्ष्मण आढारी, मो. गौस नदाफ, वासुदेव मुंडे पोशि/ शावरसिध्द पांढरे, प्रशांत सैद, सुनिल गुट्टे, तुषार काळे, सुरेश जायभाये, अजिनाथ ओंबासे, धनाजी शिंदे, सुखदेव गावंडे, गोंविद चव्हाण, नागेश माळी, राजेंद्र शेटे तांत्रिक विश्लेषन विभाग गुन्हे शाखा युनिट-४, पिंपरी चिंचवड व वाकड पोलीस ठाणे चे अधिकारी व कर्मचारी यांनी केली आहे.

**( मोहन दा. शिंदे )**
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
गुन्हे शाखा,युनिट-४,पिंपरी चिंचवड